एसईबीसी आणि ईडब्ल्युएस आरक्षण लागु केल्यामुळे बाधित झालेल्या वैद्यकीय व दंत पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांक.एमईडी १०१९/प्र.क्र.२९१/१९/शिक्षण-२
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, ९ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक :- २० सप्टेंबर, २०१९

वाचा :

१. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गाकरीता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे आणि पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८ (२०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३ यासह).
२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन पत्र क्र. एमईडी-१०१८/ प्र.क्र.४२३/ १८/ शिक्षण-२, दिनांक ०८.०३.२०१९.
३. सामान्य प्रशासन विभाग,शासननिर्णय,क्र. राआधो-४०१९/ प्र.क्र.३१/ १६-अ, दिनांक १२.०२.२०१९.
४. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र. एमईडी-१०१९/ प्र.क्र.३७/१९/ शिक्षण-२, दिनांक ०७.०३.२०१९

प्रस्तावना :

संदर्भाधीन क्रमांक १ अन्वये राज्यातील "सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गाकरीता"राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यामध्ये आरक्षण विहीत करण्यात आले आहे. त्यानुषंगाने, संदर्भाधीन क्रमांक २ वरील पत्रान्वये सदर आरक्षण आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता लागु करण्यात आले आहे.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५ (४) आणि अनुच्छेद १६ (४) अंतर्गत राज्यातील खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांक दर्जाप्राप्त शैक्षणिक संस्था वगळून शैक्षणिक संस्था/ अनुदानित विद्यालये, महाविद्यालये, सर्व उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था यामध्ये एकुण प्रवेश द्यावयाच्या जागांमध्ये १० टक्के आरक्षण सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक ३ वरील शासननिर्णयन्वये लागु करण्यात आले आहे. त्यास अनसुरुन संदर्भाधीन क्रमांक ४ वरील शासननिर्णयान्वये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राज्यातील आरोग्य विज्ञानाच्या शासकीय/ महापालिका/ शासन अनुदानित/खाजगी विना अनुदानित महाविद्यालये (अल्पसंख्यांक

शैक्षणिक संस्था वगळुन) यामध्ये प्रवेश द्यावयाच्या जागांमध्ये १० टक्के आरक्षण विहीत करण्यात आले आहे. उपरोक्त एसईबीसी आणि ईडब्ल्युएस आरक्षण लागु केल्यामुळे खुल्या प्रवर्गातील काही विद्यार्थ्यांचे प्रवेश बाधित होऊन त्यांना शासकीय महाविद्यालयाऐवजी खासगी महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागला आहे. या अनुषंगाने सेव मेरीट सेव नेशन फाऊंडेशन या संघटनेव्दारा प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक १४.०७.२०१९ रोजी मुंबई येथे मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. एसईबीसी आणि ईडब्ल्युएस आरक्षणाच्या परिणामी झालेला प्रवेशक्षमतेतील फरक पुढील वर्षापासुन भरुन काढण्यात येईल आणि चालू शैक्षणिक वर्षी एसईबीसी आणि ईडब्ल्युएस आरक्षणाच्या परिणामी बाधीत झालेल्या वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांच्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या संबधित अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्काचा शासनामार्फत भरणा करण्यास सदर बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली होती. त्यानुषंगाने निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासननिर्णय:

एसईबीसी आणि ईडब्ल्युएस आरक्षण लागू झाल्यामुळे सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षी खुल्या प्रवर्गातील काही विद्यार्थ्यांचे प्रवेश बाधीत होऊन त्यांना शासकीय महाविद्यालयाऐवजी खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागला आहे. अशा बाधीत झालेल्या व सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षी खासगी विनाअनुदानित महाविद्यालयात वैद्यकीय व दंत पदवी/ पदव्युत्तर अभ्यासक्रमांस प्रवेश प्राप्त झालेल्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या संबधीत अभ्यासक्रमाकरीता सक्षम प्राधिकरणाने विहीत केलेल्या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यास याव्दारे **<u>तत्वत:</u>** मान्यता देण्यात येत आहे.

२. बाधीत विद्यार्थ्याच्या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करतांना, सदर विद्यार्थी शासकीय वैद्यकीय/ दंत महाविद्यालयात प्रवेशित झाले असते तर त्यांना जे शुल्क भरावे लागले असते त्या शुल्काची रक्कम वजा करुन उर्वरित भरणा केलेल्या शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल.

३. सदर योजनेच्या पात्रतेसाठीचे निकष व शुल्क प्रतिपूर्तीबाबतची सविस्तर कार्यपध्दती याबाबत स्वतंत्रपणे सूचना निर्गमित करण्यात येतील.

४. सदर शुल्काची प्रतिपूर्ती योजना ही सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशप्रक्रियेदरम्यान एस.ई.बी.सी. आणि ई.डब्ल्यु.एस. या प्रवर्गाच्या आरक्षणामुळे बाधीत झालेल्या व राज्यातील खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय/ दंत (पदवी व पदव्युत्तर) महाविद्यालयात प्रवेशित झालेल्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीच लागू राहील. तसेच या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्तीही संबंधित अभ्यासक्रमाच्या किमान विहीत कालावधीकरिता (जसे की, एम.बी.बी.एस. - साडेचार वर्षे, बी.डी.एस.-चार वर्षे, पदव्युत्तर-तीन

वर्षे) देय राहील. त्याप्रमाणेच अभ्यासक्रमाच्या परीक्ष‍ेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रतिपूर्तीची रक्कम तो ज्या वर्षात अनुत्तीर्ण झाला आहे त्या वर्षाकरिता अनुज्ञेय राहणार नाही.

५. अनिवासी भारतीय कोटा तसेच व्यवस्थापन कोटा/ संस्थात्मक कोटा यामध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना सदर प्रतिपूर्ती अनुज्ञेय असणार नाही.

६. एस.ई.बी.सी. आणि ई.डब्ल्यु.एस. आरक्षण अल्पकालावधीत लागू झाल्याने बाधीत झालेल्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता शुल्काची प्रतिपूर्ती करणे ही “एक विशेष बाब” व “फक्त एकवेळेचीच बाब” म्हणून सदर निर्णय घेण्यात येत आहे.

७. शिक्षण शुल्काच्या सदर प्रतिपुर्तीकरीता पात्र विद्यार्थ्यांची यादी संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत तयार करण्यात येतील. याकरीता आयुक्त, राज्य सामाईक प्रवेशपरिक्षा कक्ष, मुंबई यांच्याकडे उपलब्ध वैद्यकीय व दंत पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रियेचे अभिलेख विचारात घेण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २८८/२०१९/व्यय-१३ अनुसार व सहमतीने आणि नियोजन विभागाच्या दिनांक २० सप्टेंबर, २०१९ रोजीच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १७६/१४७५ अनुसार व सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२०१५०९००२६१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Surendra
Pralhad Chankar

Digitally signed by Surendra Pralhad Chankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MEDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=da74ced4daa59e5121be348655e71412ea68827bae27cd8d480eb3963ff77726, cn=Surendra Pralhad Chankar
Date: 2019.09.20 15:20:25 +05'30'

(सुरेन्द्र प्र. चानकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा. राज्यपाल, यांचे प्रधान सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई.
मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.

मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
मा. राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व सह सचिव/ उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये, बृहन्मुंबई नगरपालिका, मुंबई.
सर्व अधिष्ठाता, शासकीय/ महापालिका व खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय/ दंत महाविद्यालये (संचालनालयामार्फत).
महालेखापाल -१/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरिक्षा व लेखा), मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
निवडनस्ती - कार्यासन “शिक्षण २”